जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

13 MAY 2026
पुण्यनगरी

# विद्वान सर्वत्र पूज्यते!

ज्ञान-विज्ञान



डॉ. व्ही.एन. शिंदे

**राजाने पुन्हा एक दिवस लॅम्बर्ट यांची विद्वत्ता पाहून नोंद केली, 'माणसाची पारख त्याच्या दिसण्यावरून, पेहरावावरून करून उपयोग नाही; त्याची योग्यता त्याच्या ज्ञानावरून करायला हवी.'**

ज्ञान-विज्ञानाच्या इतिहासात अनेक गमतीदार प्रसंग आणि घटना आहेत. अगदी अविश्वसनीय वाटणाऱ्या घटना दिसतात, तेव्हा 'स्वदेशे पूज्यते राजा, विद्वान सर्वत्र पूज्यते', या सुभाषिताची सत्यता पटते. गॅलिलिओ हे थोर विद्वान होते, त्यांच्या आयुष्यात त्यांची पूजा कोणीही केली नाही. हालअपेष्टांनी भरलेले नजरकैदेतील जीवन ते जगले. मात्र, त्यांच्या विद्वत्तेने आज त्यांना आपण मान देतो. निकोलाय वाविलाव रशियातील असेच एक विद्वान. त्यांनी रशियाची भूक भागवण्यासाठी आयुष्य वेचले. मात्र, त्यांचा अंत भूकेने तडफडून झाला. त्यांच्याबद्दलही आज आदराने लिहावेसे वाटते, कारण त्यांच्या ज्ञानाने, त्यांनी एका देशाला भूकमुक्त केले. मात्र, असा एक चमत्कारी संशोधक होऊन गेला, त्याने राजाला अपमान वाटावी अशी उत्तरे दिली, तरीही त्याला सन्मानाची वागणूक मिळाली.

जर्मनीच्या 'फ्रेडरिक दि ग्रेट द्वितीय' यांच्या दरबारात एक दिवस एक गबाळे कपडे घातलेल्या तरुणाला आणण्यात आले. राजाने त्याला 'कोणत्या विषयाचा अभ्यास केला' असे विचारले, तर त्याने सर्वच विषयाचा अभ्यास असल्याचे उत्तर दिले. त्याला गणिताबद्दल विचारले तर त्याने आपण उत्तम गणितज्ज्ञ असल्याचे सांगितले. 'कोणाकडे शिकलात' असे राजाने विचारल्यावर त्याने आपणच शिक्षण घेतल्याचे उत्तर दिले. त्यावेळचे सर्वात प्रसिद्ध संशोधक पास्कल होते, म्हणून राजाने त्याला विचारले की, 'तुम्ही स्वतःला प्रती पास्कल समजता का?' यावर त्याने होय असे उत्तर दिले. राजाने त्याला नोकरी दिली, मात्र त्या दिवशीच्या नोंदीमध्ये आज आपण जगातील सर्वात मूर्खाची नियुक्ती केल्याचे लिहिले. असा हा तरुण म्हणजे जोहान हेन्रिच लॅम्बर्ट.

लॅम्बर्ट यांचे आयुष्य म्हणजे असाधारण प्रतिकूल परिस्थितीत असामान्य कर्तृत्व दाखवता येते याचे वास्तव उदाहरण आहे. त्यांचा जन्म अत्यंत गरीब कुटुंबात २६ ऑगस्ट १७२८ रोजी झाला. गरिबीला कंटाळून या कुटुंबाने मुलहाउजन भागात स्थलांतर केले होते. तेथे वडील शिवणकाम करू लागले. घरात पाच भावंडे असल्याने लॅम्बर्टना शिक्षण घेणे परवडणारे नव्हते. वयाच्या बाराव्या वर्षांपर्यंतच ते शिकू शकले. शिक्षण बंद करून वडिलांना शिवणकामात मदत करायला सुरुवात केली. त्यांचे हस्ताक्षर खूपच सुंदर होते. आपले शिक्षण थांबले तरी लहान भावंडे शिकली पाहिजेत असे लॅम्बर्ट यांना वाटे. ते दिवसभर काम करून फावल्या वेळात मेणबत्त्या बनवून विकत. त्यातून आलेल्या पैशातून भावंडांच्या अभ्यासासाठी दिव्यातील तेलाची सोय करत. लहान भावंडासोबत तेही अभ्यास करत.

लेख ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

विशेषतः विज्ञानाची पुस्तके ते वाचत. त्यांचा अभ्यास पाहून त्यांच्याकडे कपडे शिवायला येणाऱ्या एका गृहस्थाने त्यांना गणिताच्या पुस्तकाचा संच भेट दिला. तो अभ्यासल्यानंतर आपण जी दिनदर्शिका वापरतो, त्यात चुका असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांचा अभ्यास पाहून दुकानातील कामगाराने त्यांना गणिताचा पुस्तकाचा पुढचा संच दिला.

कपडे शिवायला येणाऱ्यांमध्ये प्रा. झुर्शर हेही होते. त्यांनी लॅम्बर्ट यांना मोफत फ्रेंच आणि प्राचीन भाषा शिकवल्या आणि महापौरांच्या कार्यालयात कारकून म्हणून नोकरी दिली. तेथून ते एका धातूच्या कारखान्यात लेखापाल म्हणून गेले. काही दिवसांतच विधी विषयाचे प्राध्यापक इसेलीन यांचे सचिव म्हणून काम पाहू लागले. त्यांच्या शिफारसीवरून त्यांना खाजगी शिकवण्याही मिळू लागल्या. त्यांनी सर्वच विषयांचा अभ्यास केला आणि शिकवलेही. लॅटिन आणि ग्रीक भाषाही ते शिकले. वयाच्या केवळ २७ व्या वर्षी त्यांचे हवामानशास्त्राच्या निरीक्षणावर पहिले पुस्तक प्रकाशित झाले. त्यांचा हा विज्ञानक्षेत्रातील प्रवेश धडाक्यात झाला. देशविदेशात त्यांचे नाव झाले. त्यांना निमंत्रणे येऊ लागली अनेक संस्थांनी त्यांना सदस्यत्व दिले. अशाच बर्लिन भेटीवेळी त्यांची काही लोकांनी राजाशी भेट घडवून आणली आणि राजाने त्यांना पदरी ठेवूनही घेतले. लॅम्बर्ट यांचा मोठेपणा राजाला समजला नव्हता. राजाने त्यांना बांधकामावर लक्ष ठेवायचे काम दिले. आपल्याला दिलेले काम पाहून लॅम्बर्ट यांनी थेट राजाला कळवले की, 'बांधाकामाचे परीनिरीक्षण करणे हे आपले काम नाही. तुम्हाला कोणतीही अडचण असेल तर ती सोडवण्याचे काम माझे असेल अन्यथा तो माझ्या वेळेचा अपव्यय ठरेल.' राजाने त्यांना संशोधनासाठी अनुदानही दिले होते, त्यातून त्यांचे संशोधन सुरू होतेच.

लॅम्बर्ट यांच्या डोक्यामध्ये संशोधनाशिवाय इतर कोणताच विषय नसे. एकदा ते कॅफेमध्ये गेले. तेथे भलामोठा आरसा होता. या साहेबांनी गप्प कॉफी प्यायची, तर थेट गेले आरशासमोर आणि वेगवेगळ्या पद्धतीने हातवारे करू लागले. हे त्यांचे हातवारे करणे परावर्तन कसे होते हे समजून घेण्यासाठी होते. त्यानंतर त्यांनी कोज्याचा नियम मांडला. मात्र, कित्येक तास कोणाशीच न बोलता उगाच हातवारे करणारा माणूस पाहून लोकांनी त्यांची संभावना वेडा म्हणूनच केली असणार. रस्त्यावरून जातानाही त्यांच्या डोक्यात कोणता ना कोणता विषय सुरू असायचा. ते तो पुटपुटतही. एकदा तर लहान मुलांनी असे स्वतःशीच बोलत चाललेले लॅम्बर्ट पाहिले आणि 'वेडा-वेडा' म्हणून ओरडायला सुरुवात केली. लज्जा रक्षणासाठी कपडे घालायचे असतात हे मात्र लक्षात असे. मात्र, आपण कोणते, कसले कपडे घालतोय याकडे त्यांचे कधीच लक्ष नसे. त्यांनी आपल्या केसातून कधीच कंगवा फिरवला नाही. कोणाला भेटायला जायचे तर कपडे चांगले घालावेत हेही त्यांच्या कधी मनात आले नाही. राजाला भेटायला जातानाही हाताशी असणारे कपडे चढवून ते जात असत. त्यांचा अनेक मोठ्या लोकांत वावर असूनही त्यांनी आपला स्वभाव आणि पेहराव कधीच सोडला नाही.

कोज्याच्या सिद्धांतासोबत त्यांनी प्रकाशाचा रंग सिद्धांतही मांडला. त्यांनी शाई, कागद, पवनचक्की, पाण्यावर चालणारी पिठाची गिरणी, चारचाकी वाहने, झोपण्यासाठी आज वापरले जाणारे बेड्स अशा अनेक वस्तूंचा शोध लावला. त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली. त्यांच्या कार्याच्या सन्मानार्थ प्रकाशाच्या पृष्ठीय तीव्रतेचे एकक म्हणून लॅम्बर्ट यांचे नाव देण्यात आले.

त्यांच्या संशोधनामुळे त्यांचा लौकिक वाढत गेला होता. दोन महान संशोधकांच्या निमंत्रणावरून त्यांच्या अकादमीमध्ये काम करण्यासाठी राजाची नोकरी त्यांनी सोडली. मात्र, त्या दोघांत मतभेद दिसताच ते परतले. ते बर्लिन सोडून का गेले होते हे कळाल्यावर राजाने त्यांच्यासाठी नवीन अकादमी सुरू केली. राजाच्या आता लक्षात आले होते की ज्याला आपण मूर्ख मानत होतो, तो मोठा विद्वान आहे. राजाने पुन्हा एक दिवस लॅम्बर्ट यांची विद्वत्ता पाहून नोंद केली, 'माणसाची पारख त्याच्या दिसण्यावरून, पेहरावावरून करून उपयोग नाही; त्याची योग्यता त्याच्या ज्ञानावरून करायला हवी'.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००

महा न्यूज & व्ह्यूज




# स्त्रीशक्तीच्या कौशल्यातून उद्योग उभारणी शक्य: कविता देसाई

**कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

स्त्री शक्तीच्या कौशल्यातून उद्योग उभारणी शक्य असून त्यासाठी मार्गदर्शनाची आवश्यकता लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाने राबविलेला कार्यशाळेचा उपक्रम अत्यंत उपयुक्त आहे, असे प्रतिपादन कविता देसाई यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनातर्फे शुक्रवारी (दि. ८) ताराराणी चौक येथे एकदिवसीय महिला उद्योजिका क्षमता विकास कार्यशाळा पार पडली. सदर कार्यशाळेचे उद्घाटन सौ. देसाई यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

कविता देसाई यांनी महिलांना उद्योग सुरु करण्याबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. महिलांच्या अंगी असलेली मेहनत, कौशल्य, आत्मविश्वास याला जर योग्य उद्योग उभारणीच्या मार्गदर्शनाची जोड लाभली तर महिला आर्थिक दृष्ट्या सक्षम बनून स्वतःचा, कुटुंबाचा विकास साधू शकतील, असे त्या म्हणाल्या.

डॉ. सोनल विलास मंगल यांनी महिलांनी स्वावलंबी बनण्यासाठी तसेच समाजाच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडण्यासाठी उद्योजकीय क्षमता विकसित करणे आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी माया देसाई यांनी लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जीवन प्रवासाचा अल्प परिचय उपस्थितांना करून दिला. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात प्रीती बागी यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी उद्योग म्हणजे काय, तो का करावा, कसा सुरु करावा यशस्वी होण्यासाठी आवश्यक गोष्टी इत्यादीबाबत मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात प्रिया भूयेकर यांनी डिटर्जेंट बनवण्याचे प्रशिक्षण दिले. यामध्ये नीळ, फिनाईल, लिक्विड सोप, वॉशिंग पावडर, साबण, पेपर सोप इत्यादी बनवण्याबाबत प्रात्यक्षिक स्वरुपात मार्गदर्शन केले.




शुभदा कामत, लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनाच्या प्रकल्प अधिकारी डॉ. सोनल मंगल व त्यांच्या सहकाऱ्यांनी कार्यशाळेचे नियोजन केले. विजाभज, इतर मागासवर्गीय व मागासवर्गीय समाजातील महिलांनी मोठ्या संख्येने कार्यशाळेचा लाभ घेतला. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे तसेच अध्यासन समन्वयक डॉ. अवनीश पाटील यांचे कार्यशाळेसाठी प्रोत्साहन लाभले.